# अॅड. एस. ए. बाहेती महाविद्यालय, जळगांव

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल

## (शैक्षणिक वर्ष २०१७-१८)

### १) आव्हान शिबीर (कोल्हापूर) : १ जून ते १० जून २०१७ :

१ जून ते १० जून १०१७ दरम्यान आपत्ती व्यवस्थापनाचे आव्हान-२०१७ शिबीर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे संपन्न झाले. या शिबीरात आमच्या महाविद्यालयातील तीन विद्यार्थी अनुक्रमे चेतन नाईक, जयेश बोरसे व कु. संजिवनी हिरामण सावळे हे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

### २) पर्यावरण दिन : दि. ०५ जून २०१७ :

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल लोहार यांनी पर्यावरण संवर्धन काळाची गरज असल्याचे सांगितले. डिंपल बोरणारे व कृष्ण बाविस्कार या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल एस. बनसोड यांनी तर सूत्रसंचालन प्रा. निलिमा ठमके यांनी केले. याप्रसंगी वृक्षारोपण करण्यात आले.

### ३) जागतिक योग दिन : दि. २१ जून २०१७ :

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. प्रात्याक्षिक प्रा. सतिष कोगटा (क्रीडा संचालक) यांनी केले. याप्रसंगी प्राचार्य व प्राध्यापकेतर कर्मचारी व स्वयंसेवक सहभागी होते.

### ४) वृक्षारोपण कार्यक्रम : दि. १ जुलें २०१७ :

एनएसएस विभागातर्फे महाविद्यालय व परिसरात रोपे लावण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थेचे सचिव, प्राध्यापकवृंद यांचा सहभाग होता.

### ५) रासेयो उद्‌बोधन वर्ग : दि. ५ जुलें २०१७ :

महाविद्यालयात रासेयो उद्‌बोधन वर्ग दि. ५ जुलै २०१७ रोजी आयोजित करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या द्वितीय वर्षातील स्वयंसेवकांना चालू वर्षात करावयाच्या कार्याचे नियोजन देंण्यात आले. याप्रसंगी स्वयंसेवकांना कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल लोहार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.

सावळे, जयेश बोरसे, चेतन नाईक या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

**६) गुरूपौर्णिमा : दि. ९ जुलै २०१७ :**

महाविद्यालयाच्या रासेयो विभागा अंतर्गत गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रम रासेयो स्वयंसेवकांनी घडवून आणला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल लोहार यांनी विद्यार्थ्यांना गुरूविषयीचा इतिहास सांगितला. आजचा विद्यार्थी गुगल गुरूच्या मागे लागल्याने वैचारिक प्रगल्भतेपासून कोसो दूर जात असल्याची खंत व्यक्त केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. वाय.हिवरे, प्रा.एस.टी.पाटील, प्रा. के.व्ही.पाटील, प्रा. यु.के.फासे, प्रा. गोपीचंद धनगर यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांमध्ये पुजा पाटील, सलोनी शर्मा, सागर नन्नवरे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजिवनी सावळे तर आभार चेतन नाईक यांनी केले.

**७) गॅस सुरक्षा कार्यशाळा : दि. १७ जुलै २०१७ :**

महाविद्यालयात रासेयो विभागामार्फत गॅस सुरक्षा व बचत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. रेखा गॅसचे संचालक श्री. दिलीप चौबे यांनी विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिकाद्वारे गॅस सुरक्षा व गॅस बचत कशी करता येते हे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. निलिमा ठमके तर आभार प्रा. नारायण अटकोरे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनिल लोहार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**८) रासेयो उद्बोधन वर्ग : दि. २८ जुलै २०१७ :**

महाविद्यालयात रासेयो उद्बोधन वर्गाचे आयोजन दि. २८ जुलै २०१७ रोजी करण्यात आले. विद्यार्थ्यांना कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल बनसोड, उपप्राचार्य डॉ. डी.वाय.हिवरे, प्रा. खेमराज पाटील, प्रा. यु.के.फासे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयुरी सोनवणे तर आभार प्रकटन राजश्री चौधरी यांनी मानले. विद्यार्थ्यांमध्ये चेतन नाईक, संजिवनी सावळे व प्रतिक्षा बोरणारे यांनी मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमास प्रा. गोपीचंद धनगर, प्रा. श्रीकांत पाटील, प्रा. विजय ठोसर, प्रा. निलेश रामटेके, प्रा. निलिमा ठमके, प्रा. शॉनन नागोरी हजर होते.

**९) 'स्वच्छता ही काळाची गरज' या विषयावर व्याख्यान : दि. १ ऑगस्ट २०१७ :**

महाविद्यालयातील रासेयो विभागातर्फे 'स्वच्छता ही काळाची गरज' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शक मा. प्राचार्य डॉ.

ही स्वतःपासून सुरूवात करायला हवी. तरच स्वच्छ भारत मोहिम यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही, असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. (मी गंदगी करणार नाही आणि कुणाला गंदगी करूही देणार नाही.) कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल बनसोड यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. नारायण अटकोरे यांनी केले व आभार प्रकटन प्रा. निलिमा ठमके यांनी केले. कार्यक्रमास प्रा. खेमराज पाटील, प्रा. एस.टी.पाटील, प्रा. निलेश रामटेके यांचे सहकार्य लाभले.

**१०) 'रक्तदान शिबीर' : दि. १ ऑगस्ट २०१७ :**

महाविद्यालयात संस्थेचे संस्थापक स्व. बबनभाऊ बाहेती यांच्या जन्मदिनानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. उद्घाटक म्हणून उद्योजक ब्रिजलाल भार्गव, इंदू भार्गव उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सचिव रोहनभाऊ बाहेती, संचालक शशीमोहन बाहेती, शरद बियाणी, श्यामभाऊ कोगटा, सुरेश आप्पा पाटील, विनोदभाऊ बियाणी, प्राचार्य डॉ. अनिल लोहार, उपप्राचार्य डॉ. डी.वाय.हिवरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. आर.एस.बनसोड, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे डॉ. पी. बी. जैन, सुनिता वाघ, विरेंद्र बिऱ्हाडे, अन्वर खान उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. शिबीरामध्ये एकूण ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यकमाचे सूत्रसंचालन प्रा. खेमराज पाटील, तर आभार प्रकटन प्रा. राहुल बनसोड यांनी केले.

**११) स्वच्छता कॅम्प (जुने बस स्टँड) : दि. ४ ऑगस्ट २०१७ :**

ॲड. एस. ए. बाहेती महाविद्यालयातील रासेयोच्या स्वयंसेवकांनी जळगांव शहरातील जुन्या बसस्थानक व परिसराची स्वच्छता केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल लोहार सर यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल बनसोड, प्रा. नारायण अटकोरे, प्रा. निलिमा ठमके, प्रा. खेमराज पाटील, प्रा. गौतम भालेराव व प्रा. निलेश रामटेके, प्रा. श्रीकांत पाटील, प्रा. विजय ठोसर इत्यादी प्राध्यापक श्रमदानासाठी उपस्थित होते. श्रमदानानंतर रासेयो स्वयंसेवकांना नाश्ता देण्यात आला.

**१२) स्वच्छता कॅम्प (महाविद्यालय कॅम्पस्) : दि. १३ ऑगस्ट २०१७ :**

कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड, प्रा. खेमराज पाटील, प्रा. नारायण अटकोरे, प्रा. निलिमा ठमके, प्रा. यु.के. फासे, प्रा. एस. टी. पाटील, प्रा. निलेश रामटेके, प्रा. विजय ठोसर, प्रा. शानन नागोरी, प्रा. अयाज शेख, प्रा. अतुल पाटील इत्यादी प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. स्वच्छता कॅम्पनंतर सर्वांना नाश्ता देण्यात आला.

**१३) स्वच्छता रॅली आणि प्रबोधन : दि. १४ ऑगस्ट २०१७ :**

महाविद्यालयातील रासेयोचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड दत्तक गांव रिंगणगांव, ता. धरणगांव, जि. जळगांव येथे सकाळी ९.३० वा. पोहोचले. गावातील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील यांची भेट घेऊन स्वच्छतेची रॅली व प्रबोधनाबद्दल माहिती सांगितली. त्यानंतर रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीला हिरवा झेंडा दाखवून सुरूवात करण्यात आली. रॅलीमध्ये 'स्वच्छ भारत, सुंदर भारत', 'स्वच्छता पाळा, रोगराई टाळा', 'स्वच्छालय असेल जेथे, खरे आरोग्य असेल तेथे' अशा घोषणा देण्यात आल्या. नंतर रासेयो स्वयंसेवकांनी गावातील लोकांना घरोघरी जाऊन स्वच्छतेबाबत घ्यावयाची काळजी व अस्वच्छतेमुळे होणारे दूष्परिणामाबाबत माहिती सांगितली. तसेच शौच्छास उघड्यावर न जाता घरी शौच्छालय बांधावीत यासाठी प्रोत्साहीत केले. दुपारी २ वाजता जेवण करण्यात आले.

**१४) स्वातंत्र्य दिन साजरा : दि. १५ ऑगस्ट २०१७ :**

सकाळी ७.३० वा. रासेयोचे विद्यार्थी व प्राध्यापकवृंद ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे सचिव श्री. रोहन बाहेती यांच्यहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल लोहार, उपप्राचार्य डॉ. डी.वाय.हिवरे व समस्त प्राध्यापकवृंद व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अनिल लोहार सर यांच्या अध्यक्षतेखाली रासेयोच्या विद्यार्थ्यांना स्वच्छतेविषयी भविष्यात करावयाच्या कार्यासंबंधी माहिती सांगण्यात आली. स्वतःपासून सुरूवात करून स्वतः गंदगी न करणे व इतरांना करू न देणे या नियमानुसार महाविद्यालयाचा परिसर व आपण राहत असलेला परिसर कसा स्वच्छ ठेवता येईल या विषयीची माहिती प्राचार्य सर व कार्यक्रम

परिषदेतर्फे आयोजित एम.जे. कॉलेज ते शिवतीर्थ (जी.एस. ग्राऊंड) रॅलीत सहभाग घेतला. सकाळी ९.३० वा. रॅलीला सुरूवात झाली व ११.०० वा. रॅलीचा समारोप झाला. सदर रॅलीमध्ये ७१ मीटर तिरंगा ध्वज पदयात्रा आयोजित करण्यात आली होती.

**१६) राज्यस्तरीय प्रेरणा शिबीर : दि. १६ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०१७ :**

१६ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०१७ दरम्यान राज्यस्तरीय प्रेरणा शिबीर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव येथे संपन्न झाले. या शिबीरात आमच्या महाविद्यालयातील दोन रासेयो स्वयंसेवक चेतन नाईक, जयेश बोरसे या स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग घेतला.

**१७) निर्माल्य संकलन : दि. ६ सप्टेंबर २०१७ :**

जळगांव शहरातील मेहरूण तलाव येथे रासेयो विभागाअंतर्गत गणेश विसर्जनानिमित्त निर्माल्य संकलनासाठी आमच्या महाविद्यालयातील ७० विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक यांनी निर्माल्य संकलन करून पर्यावरण संरक्षणास मदत केली.

**१८) राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा : दि. २४ सप्टेंबर २०१७ :**

महाविद्यालयात २४ सप्टेंबर २०१७ रोजी रासेयो विभागातर्फे रासेयो दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.डी.वाय.हिवरे यांनी विद्यार्थ्यांना रासेयोचा इतिहास ते आजतागायत माहिती सांगितली. याप्रसंगी संजिवनी सावळे या विद्यार्थिनीने रासेयो गीत सादर केले. याप्रसंगी रागीणी जैन, आकाश भोडे, चेतन नाईक, राजश्री चौधरी, जयेश बोरसे या स्वयंसेवकांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड यांनी रासेयोचे तरूण युवकांसाठी असलेले महत्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नारायण अटकोरे तर आभार प्रदर्शन प्रा. निलिमा ठमके यांनी केले. याप्रसंगी उपस्थितींना चहा-नाश्ता देण्यात आला.

**१९) 'नया भारत हम करके रहेंगे' कार्यक्रम : दि. २७ सप्टेंबर २०१७ :**

महाविद्यालयातील रासेयोचे स्वयंसेवक जळगांव शहरातील कांताई सभागृह येथे दि. २७/०९/२०१७ रोजी 'नया भारत हम करके रहेंगे' या कार्यक्रमास उपस्थित होते. सदर कार्यक्रम उमवि, जळगांव, नेहरू युवा केंद्र, जळगांव, सूचना व गीतगायन मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता. सदर कार्यक्रमास आमच्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड, प्रा. नारायण अटकोरे उपस्थित होते.

## २०) म. गांधी जयंती साजरी : दि. २ ऑक्टोबर २०१७ :

महाविद्यालयात रासेयो विभागाअंतर्गत गांधी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल लोहार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच गांधी जयंतीनिमित्त महाविद्यालय व महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला. याप्रसंगी चहा-नाश्ता देण्यात आला.

## २१) 'व्यसनमुक्ती' युवक मेळावा : दि. ४ ऑक्टोबर २०१७ :

महाविद्यालयात रासेयो विभागाअंतर्गत व्यसनमुक्ती युवक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक चेतना व्यसनमुक्ती केंद्र, जळगांवचे श्री. नितीन विसपुते यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणे देऊन व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. याप्रसंगी श्री. आप्पा सोनवणे, प्राचार्य डॉ. अनिल लोहार, उपप्राचार्य डॉ.डी.वाय.हिवरे, प्रा. खेमराज पाटील, प्रा. एस.टी.पाटील इ. प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राहूल बनसोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. निलिमा ठमके यांनी तर आभार प्रकटन प्रा. नारायण अटकोरे यांनी केले.

## २२) वाचन प्रेरणा दिवस साजरा : दि. १५ ऑक्टोबर २०१७ :

महाविद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.डी.वाय.हिवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड यांनी अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्राची माहिती सांगितली. याप्रसंगी प्रा. यु.के.फासे, प्रा. गोपीचंद धनगर, रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

## २३) सरदार वल्लभभाई पटेल जयंती : दि. ३१ ऑक्टोबर २०१७ :

महाविद्यालयात रासेयो विभागाअंतर्गत सरदार वल्लभभाई पटेल जयंती राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्यात आली. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.डी.वाय.हिवरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड, रासेयो स्वयंसेवक व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

## २४) संविधान दिन : दि. २६ नोव्हेंबर २०१७ :

महाविद्यालयात रासेयो विभागाअंतर्गत संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड यांनी संविधान प्रास्ताविकाचे वाचन केले. जयेश

प्रा. नारायण अटकोरे तर आभार प्रा. निलिमा ठमके यांनी केले.

**२५) एडस् दिन : दि. १ डिसेंबर २०१७ :**

जळगांव शहरातून १ डिसेंबर २०१७ रोजी एडस् दिनानिमित्त रॅली काढण्यात आली. रॅली सिव्हील हॉस्पिटल, बेंडाळे चौक, जी.एस.ग्राऊंड, बस स्टँड, स्वातंत्र्य चौक, पांडे चौकमार्गे, सिव्हील हॉस्पिटल येथे समारोप करण्यात आला. रॅलीला हिरवा झेंडा जिल्हाधिकारी मा.किशोरराजे निंबाळकर यांनी दाखविला. याप्रसंगी प्रा. सतिष पडलवार, कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड व रासेयो स्वयंसेवक हजर होते.

**२६) महापरिनिर्वाण दिन : दि. ६ डिसेंबर २०१७ :**

महाविद्यालयात रासेयो विभागाअंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक एस.टी.पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून वंदन केले. त्यानंतर सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेबांना आदरांजली अर्पण करून अभिवादन केले.

**२७) युवक दिन माँ जिजाऊ जयंती : दि. १२ जानेवारी २०१८ :**

महाविद्यालयात रासेयो अंतर्गत स्वामी विवेकानंद व माँ जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड यांनी तर मनोगत प्रा. खेमराज पाटील, प्रा. निलिमा ठमके यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांमध्ये मयुरी सोनवणे, शुभम लटारे, सागर नन्नवरे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. नारायण अटकोरे व आभार प्रा. निलेश रामटेके यांनी मानले.

**२८) राष्ट्रीय मतदार दिन साजरा : दि. २५ जानेवारी २०१८ :**

महाविद्यालयातील रासेयोचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय मतदार जनजागृती रॅलीसाठी काव्यरत्नावली चौक ते कलेक्टर ऑफीस हजर होते. नंतर कलेक्टर ऑफीसला नियोजन भवन येथे झालेल्या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी मा. किशोरराजे निंबाळकर यांच्या कार्यक्रमासाठी हजर होते.

**२९) प्रजासत्ताक दिन साजरा : दि. २६ जानेवारी २०१८ :**

महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी सकाळी ८.०० वा. संस्थेचे सचिव मा.श्री.रोहनभाऊ बाहेती यांच्या हस्ते ध्वजारोहन घेण्यात आले. याप्रसंगी

अधिकारी प्रा. राहूल बनसोड, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व प्राध्यापकेतर कर्मचारी रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंतर सर्वांना चहा देण्यात आला.

**३०) म. गांधी पुण्यतिथी : दि. ३० जानेवारी २०१८ :**

महाविद्यालयात रासेयोतर्फे म. गांधी पुण्यतिथीनिमित्त म. गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रा. यु.के.फासे यांनी महात्मा गांधी यांचे जीवन व त्यांचे कार्य याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. उपप्राचार्य डी.वाय.हिवरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अतुल पाटील यांनी तर आभार प्रकटन प्रा. शानन नागोरी यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी उपस्थित होते.

**३१) मराठी दिन साजरा : दि. २७ फेब्रुवारी २०१८ :**

महाविद्यालयात मराठी दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल बनसोड यांनी मराठीचे व्यावहारिक व शैक्षणिक महत्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये मयुरी सोनवणे व कृष्णा बाविस्कर यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच प्रा. अतुल पाटील, प्रा. खेमराज पाटील यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. राजश्री चौधरी हिने तर आभार प्रकटन जयेश बोरसे याने केले.

**३२) (मातृभाषा मराठी दिनानिमित्त) गंधे सभागृह येथे कार्यक्रमास उपस्थिती साजरा : दि. २७ फेब्रुवारी २०१८ :**

आमच्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी शहरातील गंधे सभागृह येथे सायं. ५ ते ८ मराठी दिनानिमित्त उमवि द्वारे आयोजित कार्यक्रमासाठी हजर होते.

**३३) जागतिक महिला दिन : दि. ८ मार्च २०१८ :**

महाविद्यालयात रासेयो विभागाअंतर्गत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एस.टी.पाटील होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शितल पाटील यांनी केले. विद्यार्थीनींमध्ये राजश्री चौधरी, नूतन चव्हाण, दिप्ती शिंपी, प्राजक्ता माळी, मयुरी सोनवणे या विद्यार्थीनींनी मनोगत व्यक्त केले. माँ जिजाऊ, मदर तेरेसा इत्यादी ऐतिहासिक कर्तबगार महिलांचा सांस्कृती पेहराव, वेशभूषा विद्यार्थीनींनी साकारली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयुरी सोनवणे तर आभार दिप्ती शिंपी या स्वयंसेवकांनी केले.

**३४) कवि संमेलन : दि. १३ एप्रिल २०१८ :**

व ॲड. एस.ए.बाहेती महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने जयंती पूर्वसंध्येला कवि संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. अनिरूद्ध कांबळे होते. कवि संमेलनाचे उद्घाटक प्राचार्य डॉ. अनिल लोहार होते. यावेळी मुकुल सपकाळे, विजयकुमार मौर्य उपस्थित होते. कवि संमेलनात राजेंद्र पारे, मंगल पाटील, राजेश खोडके, भास्कर चव्हाण, मीना सैंदाणे, डॉ. सुषमा तायडे, प्रल्हाद खरे, रा.शे.साळुंके, प्रा. सत्यजित साळवे, वैभव पाटील, प्रा. महेंद्र पाटील, एस.पी.झाल्टे, रा.ना.कापुरे, एम.के. सोनवणे, अरूण जोशी, सतिश पवार, अशोक पारधे, इ. कवींनी कविता सादर केल्या. डॉ. मिलिंद बागुल यांनी प्रास्ताविक केलेत्र विजय गवळे व कार्यक्रम अधिकारी प्रा. आर.एस.बनसोड यांनी सहकार्य केले.

**२[illegible]) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी : दि. १४ एप्रिल २०१८ :**

महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. अनिल लोहार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. अनिल लोहार यांनी उपस्थितांना डॉ. बाबासाहेबांची दूरदृष्टी संविधानाने नागरिकांना दिलेले मूलभूत हक्क याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आर.एस.बनसोड यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रा. निलेश रामटेके यांनी केले. कार्यक्रमास प्रा. एस.टी.पाटील, प्रा. यु.के.फासे व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

**प्रा. राहुल बनसोड**
Programme Officer
National Service Scheme
Adv. S. A. Baheti College, Jalgaon

**(डॉ. अनिल लोहार)**
Principal
Adv. Sitaram(Babanbhau)Anandramji Baheti
Arts,Commerce & Science College, Jalgaon.